# धडा पाठ 17

## वारल्यांचे बंड

मी : गोदावरीबाई, तुम्ही वारल्यांसाठी खूप काम केलं होतं. त्यांच्यासाठी चळवळ करत होतात त्याबद्दल काही सांगाल?

गोदावरीबाई : का नाही सांगणार? विचारा, तुम्हाला काय विचारयचंय ते. फक्त एकच सांगते, ती चळवळ वारल्यांची होती नि 'वारल्यांचे बंड' म्हणून ओळखली जात होती. मी फक्त निमित्त मात्र होते.

मी : या प्रश्नाकडे तुमचे लक्ष कसे वेधले गेले?

गोदावरीबाई : माझे पती आणि मी ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमधे काम करत होतो. त्या निमित्ताने खूप वेळा डहाणू-तलासरी भागात जात होतो. तिथं बहुसंख्य वस्ती आदिवासींची-वारल्यांची होती. त्या वारल्यांचं दुःखी जिणं रोज डोळ्यांना दिसत होतं. आम्ही मग तिथेच काम करण्याचा निर्णय घेतला.

मी : या वारल्यांचे गरिबीशिवाय प्रश्न तरी काय होते?

गोदावरीबाई : त्यावेळी पुष्कळसे वारली गुलामीचं जिणं जगत होते. दारिद्र्य तर होतंच. ते अनेक ठिकाणी असतं पण वारल्यांना आपल्या गुलामीची, पराधीनतेची जाणीवही नव्हती. आणि तोच खरं म्हणजे महत्त्वाचा प्रश्न होता.

## वारलियों का विद्रोह

मैं : गोदावरी जी, आपने वारलियों के लिए बहुत काम किया है। उनके लिए आंदोलन भी चलाते थे। उनके बारे में कुछ बताएँगी?

गोदावरीजी : क्यों नहीं बताऊँगी? पूछिए, जो आपको पूछना है! एक बात बता दूँ। यह आंदोलन, वारली लोगों का था। इसे 'वारल्यांचे बंड' नामसे जाना जाता था। मैं तो केवल निमित्त मात्र थी।

मैं : इस समस्या की ओर आपका ध्यान कैसे आकर्षित हुआ?

गोदावरीजी : मेरे पति और मैं ठाणे जिलें के किसानों के बीच काम करते थे। इसी सिलसिले में डहाणू-तलासरी क्षेत्र में अक्सर जाते थे। वहाँ के अधिकांश लोग वारली आदिवासी थे। उन वारलियों की दुख भरी जिंदगी रोज आँखो से दिखती थी। हमने तभी उस जगह काम करने का निश्चय किया था।

मैं : गरीबी के अलावा इन वारलियों की और समस्याएँ क्या थीं?

गोदावरीजी : उन दिनों में बहुत सारे वारली गुलामी की ज़िंदगी जी रहे थे। गरीबी तो थी ही। यह तो बहुत सी जगह होती है। लेकिन वारलियों को अपनी गुलामी, अपनी पराधीनता का बोध तक न था। और देखा जाए तो यही महत्त्वपूर्ण प्रश्न था।

मैं : इसका मतलब? मैं कुछ समझा नहीं?

मी : म्हणजे? मी समजलो नाही

गोादवरीबाई : सांगते. त्यासाठी आधी वारली कशा परिस्थितीत जगत होते ते समजावून घ्या. वारली वेठबिगारीने काम करत होते. ते तांबडं फुटण्यापूर्वीच कामाला लागत होते, आणि काळोख दाटेपर्यंत काम करतच होते. या कामाचा मोबदला मिळत होता एकवेळ पुरेल एवढा भात! तो भातही लाकडाच्या उखळीत रोज कांडावा लागत होता. कांडलेल्या तांदळाची पेज, मिठाचा खडा, पाण्याबरोबर गिळून काम करावं लागत होतं. मूठभर भाताखेरीज दुसरी मजूरी मिळत नव्हती. सारेच दिवसभर कंबर मोडेपर्यंत काम करुन रात्री अर्धपोटी मरगळून पडत होते. पुन्हा पहाट झाली की रहाटगाडगं सुरू होत होतं. कसलाही आनंद नाही, रस नाही, वैचित्र्य नाही! हे पशूचं जीवन दिवसामागून दिवस, वर्षामागून वर्षे ते वारली जगत होते. त्यांचं जग त्यांचा मालक आणि त्यांचं खेडं यापुरतंच मर्यादित होतं. जीव घेतला, उपाशी ठेवलं, बायकांना पळवलं तरी ते वारली ते मुकाट्यानं सहन करत होते. येईल त्या प्रसंगाला मान तुकवत होते.

मी : तुमच्या चळवळीमुळे काय फरक पडला?

गोदावरीबाई : आम्ही फक्त वारल्यांना त्यांच्या परिस्थितीची जाणीव करून देत होतो. त्यांच्या हक्काची जाणीव करून देत होतो. वारल्यांच्या विचारांवरची धूळ

गोदावरीजी : बताती हूँ। इस के पहले यह समझने की कोशिश करें कि वारली किन परिस्थितियों में जी रहे थे। वारली बेगारी पर काम करते थे। पौ फटने से पहले ही वे अपने काम में जुट जाते थे। शामको घना अंधेरा होने तक काम में लगे रहते थे। इस कठिन श्रम के बदले मिलता था एक जून का भात! उस भात को भी लकड़ी की ओखली में कूटना पड़ता था। उस कुटे हुए चावल के माँड को नमक की डली के साथ गले से उतारकर फिर काम में लगना पड़ता था। मुट्ठीभर भात के अलावा कोई और मज़दूरी नहीं मिलती थी। दिनभर कमर तोड़ मजदूरी करके रात को आधापेट खाकर मृतप्राय हो वे सब सो जाते थे। पौ फटते ही फिर वही चक्र शुरु हो जाता था। कोई सुख नही, कोई रस नही, कोई बदलाव नहीं। यह जानवरोंका सा जीवन, दिनोंदिन, सालोंसाल वारली जिए जा रहे थे। उनकी दुनिया उनके मालिक और उनके गाँव तक ही सीमित थी। चाहे कोई उनके प्राण ले ले, उन्हें भूखा रखे, या उनकी औरतों को उठा ले जाए, वारली चुपचाप सब कुछ सह जाते थे। चाहे जो भी बात हो वे उसे सिर झ ुकाकर स्वीकार कर लेते थे।

मैं : आपके आंदोलन से क्या फर्क पड़ा?

गोदावरीजी : हम केवल वारलियों को उन परिस्थितियों के प्रति जागरूक करते थे। उन्हें उनके अधिकारों का बोध कराते थे। उनके विचारों पर जो धूल

जम गई थी उसे झाड़ते थे। आखिर

झटकत होतो. अखेर आत धगधगणारे जे असमाधान होते, जी चीड होती त्या ठिणगीचा स्कोट झाला. आमचा फक्त आधार होता. त्यांच्यातील दबलेल्या माणसाला वर उठायला आम्ही मदत करत होतो. माणूस म्हणून जगण्याचा हक्क आपल्याला आहे याची जाणीव त्यांच्यात निर्माण होत होती. वारली समाज आमूलाग्र बदलत होता हे आम्ही पाहू शकलो. हेच या चळवळीचं यश आहे असं मी मानते. यापुढेही मी हेच काम करत असेन. वारल्यांना शिकवत असेन. मलाखात्री आहे की, हे सर्व ऐकून येणाऱ्या भविण्यात तुम्ही ही मला मदत करत असाल.

उनके अंदर क्रोध और विवशता की चिनगारी भडक उठी। हमने तो केवल उन्हें सहारा दिया था। उनके अंदर जो दबा हुआ मनुष्य था उसे बाहर लाने में हमने मदद कर रहे थे। उन्हें भी मनुष्य की जिंदगी जीने का अधिकार है, की जागृति उन में आ रही थी। वारली समाज में पूर्णतः बदलाव हम देख सकें यही इस आंदोलन की सफलता है ऐसा मैं मानती हूँ। इसके बाद भी मैं यही काम करती रहूँगी। वारलियों को सिखाती रहूँगी। मुझे विश्वास है कि ये सब सुनकर भविष्य में आप भी मेरी मदद करते रहेंगे।

शब्दार्थ

| | |
|---|---|
| चळवळ | आंदोलन |
| विचारा | पूछिए |
| बंड | विद्रोह |
| निमित्तमात्र | निमित्त मात्र |
| लक्ष वेधले | ख्याल में आया |
| जिल्ह्यातील | जिले के |
| शेतकरी | किसान |
| खूप वेळा | बहुत बार |
| वस्ती | बस्ती |
| डोळा | आँख |
| डोळ्यांना दिसत होतं | आँखों को दिखती थी |
| घेतला | लिया |
| जिणं | जीवन |
| दारिद्र्य | गरीबी |
| जाणीव | बोध, भान, एहसास |
| जगत होते | जीते थे |
| वेठबिगारी | बेगारी, बंधुआ मजदूर |
| तांबडं फुटण्यापूर्वी | सूरज निकलने के पूर्व |

| | |
|---|---|
| काळोख | अंधकार |
| मोबदला | बदले में |
| एकवेळ | एक समय, एक जून, एक टंक |
| पुरेल एवढा | काफी |
| भात | धान, चावल |
| उखळ | ओखली |
| कांडलेला | कूटा हुआ |
| गिळणे | निगलना |
| मूठभर | मुट्ठीभर |
| मजूरी | मजदूरी |
| कंबर मोडेपर्यंत | कमर तोड़ |
| मरगळून पडणे | बेजान होना |
| रहाटगाडगे | दिनचक्र |
| मर्यादित | सीमित |
| उपाशी | भूखा |
| पळवलं | उठा के ले गया |
| मुकाट्याने | चुपचाप |
| मान तुकवणे | सिर झुकाना |
| धूळ झटकणे | जागरूक करना |
| चीड | चिढ़ |
| ठिणगी | चिनगारी |

## अभ्यास

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।

1) गोदावरीबाईंनी वारल्यांच्या वस्तीत काम करण्याचे का ठरविले?
2) वारल्यांचे प्रश्न कोणते होते?
3) वारली कशा परिस्थितीत जगत होते?
4) वारल्यांचे जीवन कशापुरते मर्यादित होते?
5) गोदावरीबाईंच्या चळवळीमुळे वारल्यांमध्ये काय बदल झाला?
6) गोदावरीबाई भविष्यात काय करू इच्छितात?
7) या पाठात आलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ सांगा.

II उदाहरण के अनुसार कोष्ठक में दिए गए क्रियाओं के उपयुक्त रूपों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।

1. *उदाहरण:* ती दिवसभर _____ _____ . (चालणे)
ती दिवसभर चालत होती. (चालणे)

1) तू दिवसभर काम _____ _____. (करणे)
2) मी रात्रभर पुस्तक ______ _____. (वाचणे)
3) आम्ही पसारा ______ ______. (आवरणे)
4) तुम्ही गोष्ट ______ ______. (ऐकणे)
5) माळी बागेत पाणी _____ _____. (घालणे)
6) सुमन वसतिगृहात ______ ______. (राहणे)
7) त्या दोघी थकलेल्या _____ _____. (दिसणे)
8) पिल्लं _____ ______. (ओरडणे)
9) आपण चहा _____ _____. (पिणे)
10) तो चित्रपट _____ _____. (पाहाणे)

III उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों के निषेध वाचक रूप बनाइए।

*उदाहरण:* बाबा टेकडीवर फिरायला जात होते.
बाबा टेकडीवर फिरायला जात नव्हते.

1) तू तुझ्या बहिणीशी बोलत होतास.
2) मी काल गावाला जात होते.
3) आम्हाला वारल्यांच्या परिस्थितीची जाणीव होती.
4) त्या दोघी उखळीत भात कांडत होत्या.
5) गरीब मुलं रोज अर्धपोटीच झोपत होती.
6) त्या दोघी बहिणी मुकाट्यानं सहन करत होत्या.
7) ती पिल्लं जवळपास खेळत होती.
8) आपण सगळे मावशीकडे टी.व्ही. बघत होतो.

IV उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों का परिवर्तन कीजिए।

1. *उदाहरण:* मी निबंध लिहीन.
मी निबंध लिहीत असेन.

1) अमिताभ बच्चन गाणं म्हणेल.
2) सुनील गावस्कर खूप उत्तम खेळेल.
3) ते सर्व सहलीला जातील.
4) आम्ही दुपारी हॉटेलात जेवायला जाऊ.
5) तेव्हा तू शाळेत जाशील.

2. *उदाहरण:* मी निबंध लिहीत असेन.
मी निबंध लिहीत नसेन.

1) धनराज पिल्ले उद्या खेळत असेल.
2) गाडी ठीक साडेसहा वाजता सुटत असेल.

3) मी तेथे कसबसा पोहोचत असेन.
4) यंदाचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अमळनेरला होत असेल.
5) पाचवीतले विद्यार्थी वेगात धावत असतील.

3. *उदाहरण:* मी निबंध <u>लिहीत होते</u>.
मी निबंध <u>लिहीत असेन</u>.
1) तो चहा पित होता.
2) लता मंगेशकर गाणं म्हणत होती.
3) लिएंडर पेस टेनीस खेळत होता.
4) उस्ताद अल्लारखाँ साहेब व उस्ताद झाकिर हुसेन खान साहेब तबला वाजवत होते.
5) मुले क्रिडांगणावर खेळत होती.

4. *उदाहरण:* मी गाणे <u>म्हणत असेन</u>.
मी गाणे <u>म्हणत होतो</u>.
1) सकाळी मी स्नान करत असेन.
2) आम्ही चित्रपट पहात असू.
3) आपण दुपारी झोपत असाल.
4) त्या अभ्यास करत असतील.
5) तुम्ही रात्रीसुद्धा लिहीत असाल.

V बायीं ओर दिए गए शब्दों के साथ दाहिनी ओर दिए गए शब्दों के सही अर्थ से मिलान कीजिए।

| | |
|---|---|
| कांडलेला | कविता |
| ऐकलेलं | सिनेमा |
| बघितलेला | गाणं |
| लपलेला | भात |
| वाचलेली | खलनायक |
| सजलेली | धडा |
| लिहिलेला | नवरी |
| भिजलेली | साडी |

VI उदाहरण के अनुसार कोष्ठक में दिए गए शब्दों के उपयुक्त रूपों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।
*उदाहरण:* ती माणसं काळोख _____ काम करत होती. (दाटणे)
ती माणसं काळोख <u>दाटेपर्यंत</u> काम करत होती.
1) गरीब मुलं कंबर ______ काम करून अर्धपोटी झोपत होती. (मोडणे)

2) पुस्तक वाचून ______ पहाट झाली होती. (संपणे)
3) थिएटरमधे _______ सिनेमा सुरु झाला होता. (पोहोचणे)
4) शाळेत ______ आम्ही खूप हसत होतो. (जाणे)
5) आमचा टी.व्ही. रिपेअर ______ आम्ही मावशीकडे टी.व्ही. बघत होतो. (होणे)
6) प्रकाश ______ खेळत होता. (दमणे)
7) गाडी ______ मी प्लॅटफॉर्मवर उभा होतो. (हलणे)
8) संध्याकाळी अंधार _____ मी मैत्रिणीकडेच होते. (पडणे)
9) भूक ______ बाळ छान खेळत होता. (लागणे)
10) आपण बाहेर जाऊन _______ वरात निघून गेली होती (बघणे)

VII कोष्ठक में दिए गए शब्दों में से उपयुक्त शब्द चुनकर वाक्य पूरे कीजिए।

1) वारल्यांना तांदळाची पेज खावी लागत ______. (होते, होती, होता, होतास)
2) रमेश तू काल अभ्यास करत ______. (होती, होतो, होता, होतास)
3) आम्ही नाटक बघत ______. (होता, होती, होतो, होतास)
4) तुम्ही साडी आणायला जात ______. (होतो, होता, होती, होतेस)
5) सुमन वसतिगृहात राहत ______. (होता, होतेस, होतास, होती)
6) रमेश बाळासाठी खाऊ आणत _______. (होती, होता, होतो, होतास)
7) दोन्ही पिल्लं आईसाठी ओरडत ______. (होते, होती, होतो, होतीस)
8) पांडे घर शोधायला निघत ______. (होता, होते, होतो, होती)
9) त्या मुली स्वयंपाक करत _____. (होती, होत्या, होतो, होतीस)
10) आपण झाडाखाली चिंचा खात _____. (होती, होते, होतो, होतास)

VIII संवाद पूरे कीजिए।

प्रिया - सुमन, अंग तुला आपल्या देशातल्या चळवळींबद्दल माहीतच आहे ना?
सुमन - .........................................................................
प्रिया - हो, त्याच स्वातंत्र्याबद्दलच्या! अगं आपल्या महाराष्ट्रातील किती तरी लोकांनी भाग घेतला त्यात!
सुमन - .........................................................................
प्रिया - हो. तेच ते. आणि बंगालचे बोस आणि पाल. सगळा भारतच गुलामीतून सुटण्यासाठी धडपडत होता.
सुमन - .........................................................................
प्रिया - हो बघ ना! दोनशे वर्षे राज्य केलं त्यांनी आपल्या देशात!
सुमन - .........................................................................
प्रिया - गांधीजींच्या अहिंसेपुढे त्यांनी गुडघे टेकले. आणि ते परत गेले.

IX नीचे दिए गए चारों खंडों में से उपयुक्त शब्द चुनकर वाक्य बनाइए।

1.

| | | | |
|---|---|---|---|
| मी | शाळेत | खेळत | होते. |
| आम्ही | क्रिंडागणावर | विकत | होतात. |
| तू | ग्रंथालयात | झोपत | होतो. |
| तुम्ही | बाजारात | चढत | होता. |
| राम | स्वयंपाकखोलीत | जात | होती. |
| सीता | बागेत | वाचत | होतं. |
| मांजर | टेकडीवर | येत | होता. |

2.

| | | | |
|---|---|---|---|
| मी | काम | खात | नव्हतास. |
| आम्ही | काही | जात | नव्हते. |
| तू | कुठेच | थकत | नव्हतो. |
| आपण | सारखे | करत | नव्हती. |
| रामभाऊ | नेहमी | वाचत | नव्हते. |
| सीताबाई | कधीच | लिहीत | नव्हत्या. |

X कोष्ठक में दी गई सूचना के अनुसार वाक्यों का परिवर्तन कीजिए।

1) मी झाडाजवळ गेले. (सामान्य भविष्यत्काल)
2) ते सारखे रडत आहेत. (अपूर्ण भूतकाल)
3) तुमचे उपकार मी विसरणार नाही. (सामान्य वर्तमानकाल निषेधवाचक)
4) सर्वांनी ते पुस्तक वाचले होते. (पूर्ण वर्तमानकाल)
5) तू पत्र लिहिले स. (सामान्य वर्तमानकाल)
6) शिक्षक वेळेवर पोहोचले आहेत. (पूर्ण भूतकाळ)
7) मुली कबड्डी खेळतात. (सामान्य भूतकाल)
8) मुले शिक्षकांजवळ तक्रार करत असतील. (अपूर्ण वर्तमानकाल)
9) तू खोटे बोलत असशील. (अपूर्ण भूतकाल)
10) आपला राष्ट्रध्वज 'तिरंगा' फडकत आहे. (अूपर्ण भविष्यत्काल)
11) मी अभ्यास पूर्ण केला आहे. (पूर्ण भविष्यत्काल)

XI पढिए और समझिए

आपलाच देश, आपलीच माणसं!

मी एकटीच जंगलातून पायवाटेनं जात होते. बांधाबांधावरून जाणारी नागमोडी पायवाट. एक गुराखी मुलगा मला वाट दाखवत होता. मी त्याच्याच घरी जात होते आणि विचार करत होते, "यांची स्थिती कशी असेल? हे लोक कसे राहात असतील? काय खात असतील? बहुधा यांना पुरेसं अन्न मिळत नसेल. अंगभर

कपडाही मिळत नसेल. आणि जे मिळत असेल तेही पुरेसं असेल का? ..." इ.इ. मी झपझप चालत होते. डोंगर चढून माथ्यावर पोचते तो सूर्याचा लालभडक गोळा बुडत होता. मी तशीच स्तब्ध उभी राहिले. सूर्य बुडताच अंधार दाटू लागला. क्षणाक्षणानं अंधार दाटत होता. झोपड्यांमधून पेटलेल्या शेकोट्या दिसत होत्या. आम्ही घरी पोचलो. ती खोपटी इतकी लहान होती की वाकल्याशिवाय तिच्यात प्रवेश करताच येत नव्हता. मी कमरेत वाकूनच खोपटीत शिरले.

घरमालक कुडाला टेकून विडी ओढण्यात मग्न होता. त्याला कशाचीही दखल नव्हती, आमचीसुध्दा! आतलं दृश्य पाहून माझ्या छातीत धस्स झालं. मालकिणीभोवती मोठ्या पोटाची उघडी नागडी पोरावळ एकच गिल्ला करत होती. मी गेल्यावर एकदम शांतता पसरली. त्या बाईच्या शेजारी एका मडक्यात पेज दिसत होती. जाडे लालसर तांदूळ, ओबडधोबड चिरलेल्या कांद्याच्या फोडी आणि मीठ घालून उकळलेलं ते मिश्रण! करवंटीच्या पळीनं ती ते मिश्रण पोरांच्या कटोऱ्यांत वाढत होती, एक कटोरा संपला, की पुनः भरत होती. मुले ते पाणी ओरपून ओरपून पीत होती. भाताची शिते व कांद्याच्या फोडी चाटून पुसून खात होती. पाणी ओरपून ओरपून ती पोरं बसल्याजागीच मरगळून पडली. मी होते म्हणून ती बाई आणि तो पोरगा मात्र ताटकळत बसले होते. मी म्हटलं, "कागं? मुलांच पोट भरलं? ती तर झोपली की?" ती म्हणाली, "अर्धपोटीच झोपावं लागतं, काय करणार?"

माझे डोळे भरून आले. घरची आठवण झाली. भरल्यापोटी चॉकलेट - बिस्किटांचे डबे फस्त करणारी नातवंडं डोळ्यासमोर दिसत होती. माझ्या मनात विचारांचे काहूर उठले. मला वाटले, किती वेगळे आहे हे जग!

आपलाच देश, आपलीच माणसे, पण केवढा हा फरक!!

शब्दार्थ

| | |
|---|---|
| आपला | हमारा |
| जंगलातून | जंगल में से |
| पायवाट | पगडंडी |
| नागमोडी | बलखाती |
| गुराखी | चरवाहा |
| वाट | राह |
| स्थिती | स्थिति |
| बहुधा | ज्यादातर |
| पुरेसं | पर्याप्त |
| अन्न | खाना |
| अंगभर | तनभर |
| कपडा | वस्त्र |
| झपझप | तीव्रगतीसे |

| | |
|---|---|
| चढून | चढ़कर |
| सूर्याचा लालभडक गोळा | सूरज का लाल सुर्ख गोला |
| बुडत होता | डूब रहा था |
| स्तब्ध | चुपचाप, स्तब्ध |
| उभी राहिले | खड़ी रही |
| पेटलेल्या | जलती हुई |
| शेकोटी | अलाव |
| खोपटी | छोटी सी झोपड़ी |
| शिरले | घुसना |
| घरमालक | मकान मालिक |
| टेकून | टिककर |
| कुड | बाँस की दीवार |
| विडी | बीड़ी |
| दखल | परवाह |
| आतलं | अंदर का |
| छातीत | छाती में |
| धस्स होना | धक् रह जाना |
| मालकीण | मालकिन |
| मोठ्या पोटाची | बड़े पेट के |
| उघडी-नागडी | नंग-धड़ंग |
| गिल्ला | शोर |
| मडक्यात | मटके में |
| पेज | माँड़ |
| जाडे | मोटे |
| कांदा | प्याज |
| फोडी | टुकड़े |
| मीठ | नमक |
| उकळलेलं | उबलता हुआ |
| करवंटी | नारियल के खोल का आधा भाग |
| बसल्या जागीच | बैठने की जगह पर ही |
| भरल्यापोटी | भरेपेट |
| नातवंडं | नाती-पोती |
| काहूर | तूफान |
| फरक | फर्क |

## अभ्यास

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।

1) लेखिकेला वाट कोण दाखवत होता?
2) घरमालक काय करत होता?
3) घरमालकिणीभोवती गिल्ला करणारी मुलं कशी होती?
4) मुलांची आई मुलांना काय वाढत होती?
5) लेखिकेच्या मनात काहूर का उठले?

II वार्तालाप के आधार पर उपयुक्त शब्दों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।

1) ती चळवळ ______ होती. वारल्यांचे ______ म्हणून ओळखली जात होती.
2) त्या वारल्यांचं ______ जिणं रोज डोळ्यांना दिसत होतं.
3) ते ______ फुटण्यापूर्वीच ______ लागत होते आणि _____ दाटेपर्यंत काम करत होते.
4) त्यांच जग त्यांचा ______ आणि ______ यापुरतंच मर्यादित होतं.

III नीचे दिए गए दो शब्द समूहों में से समानार्थी शब्द चुनकर सही जोड़ियाँ बनाइए।

| | |
|---|---|
| अंधार | झोपडी |
| कंगोरे | पूर्णतः |
| चळवळ | जाणीव |
| जिणं | बारकावे |
| गरिबी | काळोख |
| ठिकाण | आंदोलन |
| परावलंबन | जीवन |
| खोपटी | दारिद्र्य |
| आमूलाग्र | जागा |
| दखल | परस्वाधीनता |

IV अनुच्छेद में रेखांकित किए गए शब्दों के स्थान पर कोष्ठक में दिए गए सही मुहावरों का प्रयोग कीजिए।

(डोळे भरून येणे, कंबर मोडणे, मान तुकवणे, काळोख दाटणे, तांबडं फुटणे, रहाट गाडगे सुरू होणे)

वारली <u>पहाटेपासून</u> <u>संध्याकाळपर्यंत</u> पार <u>दमून</u> <u>जाइस्तोवर</u> काम करत होते. त्यांना विश्रांती नव्हतीच. सकाळ झाली की <u>पुनः तोच दिनक्रम चालू</u>! येईल त्या परिस्थितीशी ते <u>जमवून घेत होते</u>. त्यांची स्थिती पाहून <u>मला फार वाईट वाटलं</u>.

V नीचे दिए गए शब्दों में से चार वाक्यांश बनाइए जिनमें एक-एक विशेषण और एक एक संज्ञा हो।
मूठभर, लालभडक, धगधगणारे, नागमोडी, असमाधान, सूर्य, पायवाट, भात

VI 'मूठभर' इस का अर्थ है मुट्ठी भर। इस का प्रयोग नीचे दिए गए वाक्यों में किया गया है। इसी प्रकार और दो वाक्य बनाइए।

1) मूठभर भाताच्या पेजेवर सबंध कुटुंब जेवलं.
2) मूठभर मावळ्यांच्या मदतीनं शिवाजी लढला.

VII 'सकाळ होणे' इस मुहावरे के लिए नीचे दिए गए मुहावरे समान अर्थ में प्रयुक्त किए जाते हैं। उन्हें पढ़िए और उनका वाक्यों में प्रयोग कीजिए।

1) तांबडं फुटणे
2) झुंजुमुंजु होणे
3) कोंबडा आरवणे
4) पहाट होणे
5) दिवस उगवणे

VIII उदाहरण के अनुसार नीचे दिए गए क्रियाओं से विशेषण बनाकर उनका वाक्यों में प्रयोग कीजिए।
*उदाहरण:* पडणे = पडलेला = खाली पडलेला रूमाल उचल.

1) बघणे
2) बसणे
3) आणणे
4) देणे
5) दाखवणे
6) पाठविणे
7) करणे

IX हिंदी में अनुवाद कीजिए और उपयुक्त शीर्षक दीजिए।

'भारताची गानकोकिळा' व 'महाराष्ट्रकन्या' लता मंगेशकर गात होती, 'ए मेरे वतन के लोगो' आणि भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंयांच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. ही किमया लतादीदींच्या आवाजाची होती, गीताच्या शब्दांची होती, संगीताची होती. महाराष्ट्राला साहित्य व संगीताची वैभवशाली परंपरा व वारसा लाभलेला आहे. महाराष्ट्रात अनेक जगप्रसिद्ध कलाकार राहात आहेत, राहात होते व राहात असतीलही. कारण महाराष्ट्र कलावंतांची भूमी आहे. येथे साहित्य, संगीत, नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प, अभिनय, लोककला इ. क्षेत्रांतील अनेक कलाकार आढळतात. परंतु येथे आपण महाराष्ट्रातील संगीतकलेचा व लोकसंगीत-

लोकगीतांचा विचार करणार आहोत. यात शास्त्रीय-उपशास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, तमाशा, लावणी, कीर्तन, पोवाडे, गोंधळ, भारूडे, लोकसंगीत, इ. चा समावेश होतो.

नाटकातील गीत म्हणजे नाट्यगीत. यात नाटकातील पात्राच्या भावभावना इ. व्यक्त केलेल्या असतात. हा काव्यप्रकार भावगीताला जवळचा आहे. त्यातून नाटकाचे कथानक पुढे सरकते.

फुगडी, टिपरी, झिम्मा, पिंगा, गौरीचा नाच, दसरा नृत्य, तमाशातील नृत्य, इ. स्त्रीनृत्ये, दिंडी नृत्य, दही काला, टिपरी गोफ, लेझीम, ढोलाचा नाच, दशावतार, घेराचा नाच, कोळी नृत्य, कुणबी नाच. इ. पुरुषांची नृत्ये महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. हे महाराष्ट्राचे विशेष नृत्यप्रकार आहेत.

महाराष्ट्र लोकगीते व लोककलांसाठीही प्रसिद्ध आहे. त्यात तमाशा हा मुख्य प्रकार असून त्यात लावणी संकलित स्वरूपात दिसते. लावणीमुळे तमाशाला आकार येतो. गण-गवळण-श्रृंगारिक लावण्या, भेदिक लावण्या, मुजरा तमाशात येतात. यात सोंगाड्या महत्त्वाचा असतो. सर्वसामान्य जनसमुदायाची बौद्धिक भूक भागवण्याचे काम तमाशातील लावणी करते. होनाजी बाळाचा तमाशा प्रसिद्ध होता. लावणी म्हणजे एक प्रकारचे ग्राम्यगीत. गेयता, श्रृंगार व ग्राम्यता ही लावणीची लक्षणे. यात सवालजबाब असतात, अध्यात्म असते, भक्ती असते. लावणी बरोबर तालासाठी ढोलकी वाजविली जाते. ढोलकीवर थाप पडताच लावणी सुरू होते. रामजोशी, अनंतफंदी, प्रभाकर यांच्या लावण्या लोकप्रिय आहेत. दृकश्राव्यात्मकता, काव्याचे शुद्ध मराठीपण, बहुजनांसाठीचे काव्य व नाट्यात्मकता हे लावणीचे विशेष. उपदेशपर, वैराग्यपर, देवतावर्णनपर, कथनपर, संत-स्थान माहात्म्यपर, सामाजिक व विनोदी इ. प्रकारच्या लावण्या आढळतात. मनोरंजन व उद्बोधन ही लावणीची प्रेरणा आहे.

पोवाडा म्हणजे ठासून स्तुती करणे. वीरांच्या पराक्रमाचे, विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे, एखाद्याच्या सामर्थ्याचे, गुण, कौशल्य इ. चे काव्यात्म वर्णन-प्रशस्ती म्हणजे पोवाडा होय. पोवाड्याची रचनापद्धती कथानिवेदनपद्धतीप्रमाणे म्हणजे प्रथम देव-देवतांना आवाहन, नमन, मुख्य कथा प्रस्ताव, कथा इ. क्रमाने असते. भूपाळी हा एक प्रभावी गीतप्रकार असूनती पहाटे म्हणतात.

भारूड हा लोकगीताचा एक प्रकार आहे. 'बहुरूढ गीत म्हणजे भारूड' वाच्यार्थ व लक्ष्यार्थ असे अर्थाचे दोन स्तर असणारे काव्य म्हणजे भारूड. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांची भारूडे प्रसिद्ध आहेत. एकनाथांनी सुमारे १२५ भारूडे लिहीली. वारकरी नेहमी भारूडे म्हणतात. महाराष्ट्रात आजही भारूड लोकप्रिय आहे.

कीर्तन हा वाङ्मयाचा प्रसार होण्याचा मार्ग असून त्यात पुराणकथन येते. यातून पूर्वीची स्त्री शिकत होती. नारदीय, भजनी व हरिदासी कीर्तन हे कीर्तनाचे प्रकार. यात तत्त्वज्ञान, अभंग, श्लोक, गेयता, हरिभजन, नित्य पूजाविधी, आरत्या, संगीत इ. चा वापर होतो. विशेषतः वारकरी पंथात व सर्वसामान्य लोकांत आजही कीर्तन लोकप्रिय आहे.

महाराष्ट्रात 'गोंधळ' लोकप्रिय आहे. घरातील लग्नकार्याच्या वेळी कुलदैवताच्या प्रसन्नतेसाठी 'गोंधळ' घालतात. हा लोकविधी आहे. गोंधळ्यांच्या अंगावर

तेलकट कपडे, गळ्यात कवड्यांची माळ, डोक्यावर पगडी, हातात संबळ व तुणतुणे असते. प्रथम गणपतीला आमंत्रण देतात, मग इतर देवांना. दिवटी पेटवतात, नाचतात, गातात. ही लोकसंस्कृती आहे. महाराष्ट्रात आजही 'गोंधळ' घालतात.

महाराष्ट्रातील खानदेशात श्रावणात कानबाईचा उत्सव साजरा करतात. यालाच 'रोट' म्हणतात. देवीची पूजा करतात. कानबाई व राणूबाई ह्या दोन बहिणी आहेत असे मानतात. हा उत्सव (सण) फक्त खानदेशातच साजरा होतो.

याशिवाय महाराष्ट्रात देवीची, वासुदेवाची, पोतराजाची, वाघ्यामुरळीची, दिवाळीची (विविध सणांची), कानबाईची, भुलाबाईची गीते, भलरी गीते, कोकणी गीते आदिवासींची, वारल्यांची, वंजाऱ्यांची लोकगीते, भोंडल्याची गीते, सरस्वतीची गीते, गौळणी प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत. ही गीते लोकगीते असून त्यात बोलीतील शब्द, त्या-त्या प्रदेशाचे किंवा विधीचे वर्णन, संगीत, नृत्य व गायन इ. चा आविष्कार होतो.

जो महाराष्ट्राच्या लोकगीतांचा, संगीताचा अभ्यास करत असेल, महाराष्ट्राची संस्कृती समजून घेत असेल त्याला या सर्वांचा विचार करावाच लागेल.

X मराठी में अनुवाद कीजिए।

मैं अपने मामा के गाँव खेतिया गई थी। वह मध्यप्रदेश और महाराष्ट्र की सीमा पर स्थित है। वहीं पास के जंगलों में 'पावरे' जाति के आदिवासी रहते हैं। वहाँ पर शनिवार को बाज़ार लगता है। उस दिन ये 'पावरे' लोग तड़के ही आ जाते हैं। अपने साथ वे गोंद, शहद, आँवले और शुद्ध घी लेकर आते हैं। वे अपने साथ हफ्ते भर का सामान लेकर जाते हैं। मेरे मामा की दुकान पर भी वे आते थे। उन औरतों की वेशभूषा निराली ही थी। कानों में बड़े बड़े झुमके और गले में रंगबिरंगी मणियों की मालाएँ। मैं घंटों उन्हें देखा करती थी।

एक बार मैं निबाली गई। निबाली खेतिया के पास ही है। वहाँ भगोरिया मेला लगा था। यह भील आदिवासियों का बड़ा त्योहार है। मेले में भील युवक-युवतियों की बड़ी भीड़ थी। ढोल-नगाड़े पर उनका नाचना-गाना देखने लायक था। उनकी खुशी भी देखते ही बनती थी। भगोरिये मेले की उस रंगत को मैं बहुत समय तक याद करती रहूँगी। मुझे उन उन्मुक्त भील युवक युवतियों की तरह नाचना गाना नहीं आता। फिर भी मैं उनके गीतों को बार-बार गुनगुनाती रहूँगी, ढोल-चंग की तान पर थिरकता रहूँगी।

XI नीचे दिए गए शब्दों का वाक्यों में प्रयोग कीजिए।

चळवळ, निमित्त, दारिद्र्य, जाणीव, प्रश्न, लक्ष, बहुसंख्य, आदिवासी, निर्णय, वेठबिगारी, काळोख, मोबदला, वैचित्र्य, प्रसंग, परिस्थिती

XII किसी परिचित जनजाति के बारे में मराठी में एक अनुच्छेद लिखिए।

## टिप्पणियाँ

I इस पाठ में अपूर्णभूतकाल और अपूर्ण भविष्यत् काल के प्रयोग सिखाए गए हैं। नीचे दिए गए वाक्यों के रेखांकित क्रियारूपों पर ध्यान दीजिए।

*उदाहरण:*

1) वारली वेठबिगारीने काम करत होते.
   वारली बेगारी पर काम करते थे।
2) तो भातही लाकडाच्या उखळीत कांडावा लागत होता.
   उस भात को भी लकड़ी की ओखली में कूटना पड़ता था।
3) पुन्हा पहाट झाली की रहाटगाडगं सुरू होत होतं.
   पौ फटते ही फिर वही चक्र शुरू हो जाता था।
4) येईल त्या प्रसंगाला मान तुकवत होते.
   चाहे जो भी बात हो वे उसे सिर झुकाकर स्वीकार कर लेते थे।
5) मूठभर भाताखेरीज दुसरी मजूरी मिळत नव्हती.
   मुट्ठीभर भात के अलावा कोई और मज़दूरी नहीं मिलती थी।

उपर्युक्त वाक्यों के रेखांकित क्रिया रूपों में अपूर्ण भूतकालिक क्रियाओं का प्रयोग किया गया हैं। मराठी में अपूर्ण भूतकालिक क्रियारूप बनाने के लिए मूल क्रिया में '-त' प्रत्यय लगाकर अंत में 'होता' के उपयुक्त रूपों का प्रयोग होता है। ध्यान दें कि, मराठी में अपूर्ण भूतकालिक क्रिया केवल कर्ता के पुरुष, वचन और लिंग का अनुसरण करती है। इनका निषेधवाचक रूप बनाने के लिए 'होता' के स्थानपर 'नव्हता' के उपयुक्त रूपों का प्रयोग किया जाता है।

II नीचे दिए गए वाक्यों के रेखांकित क्रिया रूपों को देखिए।

*उदाहरण:*

1) यापुढेही मी हेच काम करत असेन.
   इसके बाद भी मैं यही काम करती रहूँगी।
2) वारल्यांना शिकवत असेन.
   वारलियों को सिखाती रहूँगी।
3) मला खात्री आहे की, हे सर्व ऐकून येणाऱ्या भविष्यात तुम्हीही मला मदत करत असाल.
   मुझे विश्वास है कि ये सब सुनकर भविष्य में आप भी मेरी मदद करते रहेंगे।

उपर्युक्त वाक्यों के रेखांकित क्रिया रूपों में अपूर्ण भविष्यत् कालिक क्रियाओं का प्रयोग किया गया है। मराठी में अपूर्ण भविष्यत् कालिक क्रियारूप बनाने के लिए मूल क्रिया में '-त' प्रत्यय लगाकर अंत में 'अस' क्रिया के उपयुक्त भविष्यत् कालिक

रूपों का प्रयोग होता है। ध्यान दें कि, मराठी में अूपर्ण भविष्यत् काल में क्रिया पर लिंग का कोई प्रभाव नहीं पडता। केवल वचन और पुरुष के अनुसार 'अस' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग होता हैं।

III अपूर्ण भविष्यत् कालिक क्रियाओं का निषेधवाचक रूप बनाने के लिए 'अस-' क्रिया के स्थान पर 'नस' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग किया जाता है।
अपूर्ण भविष्यत् काल निषेधवाचक
*उदाहरण:*
1) वारल्यांना शिकवत <u>असेन</u>. वारलियों को सिखाती रहूँगी।
2) वारल्यांना शिकवत <u>नसेन</u>. वारलियों को नहीं सिखाती रहूँगी।

IV मराठी में 'जाने तक', 'आने तक' इस प्रकार के प्रयोग के लिए स्वरांत क्रिया शब्द में '-ई' और व्यंजनांत क्रिया शब्द में '-ए' प्रत्यय जोड़कर अंत में -'पर्यंत', या '-तो', या '-स्तोवर' परसर्ग लगाया जाता है।
*उदाहरण:*
1) ते काळोख <u>दाटेपर्यंत</u> काम करतच होते. (दाट + ए + पर्यंत)
शाम को घना अंधेरा होने तक वे काम में लगे रहते थे।
ते काळोख <u>दाटेतो</u> काम करतच होते. (दाट + ए + तो)
ते काळोख <u>दाटेस्तोवर</u> काम करतच होते. (दाट + ए + स्तोवर)
2) मी <u>येईपर्यंत</u> जाऊ नकोस. (ये + ई + पर्यंत) मेरे आने तक न जाओ।
मी <u>येईतो</u> जाऊ नकोस (ये + ई + तो)
मी <u>येईस्तोवर</u> जाऊ नकोस. (ये + ई + स्तोवर)
3) मी <u>येईपर्यंत</u> थांब. (ये + ई + पर्यंत) मेरे आने तक रूको।

IV 'केलेला' (किया हुआ) इस प्रकार के भूतकालिक कृदंत विशेषण बनाने के लिए मराठी में क्रिया शब्द में '-लेला' या '-लेली' या '-लेले' प्रत्यय लिंग-वचन के अनुसार लगते हैं। ध्यान दें कि यदि विशेष्य में विभक्ति लगी हो तो क्रिया शब्द में '-लेल्या' प्रत्यय लगता है।
*उदाहरण:* खाल + लेली = खाल्लेली (खाई हुई)
(ये) आ + लेला = आलेला (आया हुआ)
(जा) गे + लेले = गलेले (गये हुए)
आलेल्या मुलीला = आई हुई लड़की को